R.No. MHAMAR/25/A3029

# दैनिक महावृत्त

E-mail : dainikmhavratt@gmail.com

R.No. MHHMAR/25/A3029

लातूर

वर्ष : ६ वे, अंक नं. : ७३

दि.२८ फेब्रुवारी २०२६,वार: शनिवार

पाने : ४, किंमत : स्वागत मूल्य २ रु.

संपादक - अशोक हनवते मो. 9421094991, 7264079990

## पोलीस अधीक्षकांच्या विशेष पथकाची कारवाई.अवैध मटका जुगारावर छापा; आरोपी ताब्यात, मुद्देमाल जप्त.

लातूर :-लातूर शहर व जिल्ह्यातील अवैध धंद्यांवर आळा घालण्यासाठी लातूर जिल्हा पोलीस दलाकडून सातत्याने कठोर कारवाया करण्यात येत आहेत. नागरिकांच्या शांतता, सुरक्षितता व कायदा सुव्यवस्था अबाधित राखण्याच्या दृष्टीने पोलीस अधीक्षक श्री. अमोल तांबे यांनी विशेष पथक स्थापन करून अवैध धंद्यांविरुद्ध मोहीम सुरू केली आहे. त्याच मोहिमेअंतर्गत लातूर शहरातील गांधी चौक पोलीस ठाणे हद्दीत अवैध मटका जुगारावर प्रभावी कारवाई करण्यात आली.

दि. २६ फेब्रुवारी २०२६ रोजी पोलीस अधीक्षक श्री. अमोल तांबे यांच्या विशेष पथकातील अधिकारी व कर्मचारी अवैध धंद्यांविरोधात गस्त घालत असताना त्यांना गुप्त बातमीदारामार्फत खात्रीशीर माहिती मिळाली की, लातूर शहरातील हत्ते कॉर्नर परिसरात भगवान पान शॉप समोर एक इसम उघड्यावर बसून कल्याण नावाचा मटका जुगार खेळत व खेळवत आहे. सदर माहिती वरून पोलीस पथकाने तात्काळ घटनास्थळी छापा टाकला. तेथे एक इसमास ताब्यात घेऊन त्याची चौकशी केली असता त्याने त्याचे नाव

१) शिवराज राम मामडगे (वय ३० वर्षे, व्यवसाय मजुरी, रा. कासारगाव, ता. जि. लातूर).- असे सांगितले. याची अंगझडती घेतली असता त्याच्याकडून मटका जुगाराचे साहित्य, आकड्यांची चिठ्ठी तसेच रोख रक्कम मिळून आली.

तपासणीदरम्यान आरोपीकडून मटका जुगाराचे आकडे लिहिलेली चिठ्ठी,रोख रक्कम, मोबाईल असा एकूण अंदाजे रु. २२,५६०/- किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

या प्रकरणी आरोपी शिवराज राम मामडगे याच्याविरुद्ध महाराष्ट्र जुगार प्रतिबंधक अधिनियम कलम १२ (अ) अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे.

सदर कारवाई पोलीस अधीक्षक श्री. अमोल तांबे यांच्या मार्गदर्शनाखाली व अपर पोलीस अधीक्षक श्री. मंगेश चव्हाण यांच्या निर्देशनात व मार्गदर्शनात विशेष पथकातील पोलीस उपनिरीक्षक आयुब शेख, श्रेणी पोलीस उपनिरीक्षक जाधव, युसुफ शेख, रामहरी भोसले, पोलीस नाईक संतोष गिरी, राम गवारे, घुगे व दीपक वैष्णव यांनी केली आहे.

लातूर जिल्हा पोलीस दलाकडून अवैध धंदे, जुगार, मटका तसेच समाजविघातक कृत्यांविरुद्ध भविष्यातही अशाच प्रकारे कठोर कारवाई करण्यात येणार असून नागरिकांनी अशा बेकायदेशीर प्रकारांची माहिती पोलिसांना देऊन सहकार्य करावे, असे आवाहन पोलीस प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

## लातूर जिल्हा परिषद अध्यक्ष, उपाध्यक्ष निवड १६ मार्चला तर सभापती, उपसभापती यांची निवड ९ मार्चला होणार

लातूर : जिल्ह्यातील जिल्हा परिषद अध्यक्ष/उपाध्यक्ष तसेच पंचायत समिती सभापती/ उपसभापती पदांच्या निवडणुकांचे वेळापत्रक जाहीर झाले असून, त्याचवेळी जिल्हा परिषदेत सत्ता स्थापनेचे राजकारणही रंगात आले आहे.

प्रशासनाने जाहीर केलेल्या कार्यक्रमानुसार पंचायत समिती सभापती व उपसभापती पदांसाठीची निवडणूक ९ मार्च २०२६ रोजी दुपारी २ वाजता होणार आहे. तर जिल्हा परिषद अध्यक्ष व उपाध्यक्ष पदांसाठीची निवडणूक १६ मार्च २०२६ रोजी दुपारी २ वाजता आयोजित करण्यात आली आहे.

या निवडणुकांसाठी पिठासीन अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे. जिल्हा परिषदेसाठी अप्पर जिल्हाधिकारी पिठासीन अधिकारी असतील. लातूर, औसा, निलंगा, उदगीर व अहमदपूर पंचायत समित्यांसाठी संबंधित उपविभागीय अधिकारी, तर रेणापूर, देवणी, शिरूर अनंतपाळ, जळकोट आणि चाकूर पंचायत समित्यांसाठी संबंधित तहसीलदार पिठासीन अधिकारी म्हणून काम पाहतील.

दरम्यान, जिल्हा परिषदेत सत्ता स्थापनेचे चित्र अद्याप स्पष्ट झालेले नाही. एकूण ५९ सदस्यांच्या सभागृहात काँग्रेसकडे २३ सदस्य, भाजपकडे १८ सदस्य तर राष्ट्रवादी काँग्रेसच्या अजित पवार गटाकडे १२ सदस्य आहेत. कोणत्याही पक्षाला स्वबळावर बहुमत नसल्याने सत्ता समीकरणात अजित पवार गटाची भूमिका निर्णायक ठरणार आहे.

हा गट काँग्रेससोबत जाणार की भाजपला साथ देणार, याबाबत अद्याप अधिकृत भूमिका जाहीर झालेली नाही. त्यामुळे जिल्हा परिषदेत सत्तास्थापनेचा 'चेंडू' सध्या अजित पवार गटाच्या कोर्टात असल्याचे राजकीय वर्तुळात बोलले जात आहे.

## उत्तमराव तरकसे यांच्या कथासंग्रहाला उत्कृष्ट वाङ्मय पुरस्कार उत्तमराव तरकसे यांच्या कथासंग्रहाला उत्कृष्ट वाङ्मय पुरस्कार

पुणे/ प्रतिनिधी :- दरवर्षी वास्तुत मा. श्री. लक्ष्मीकांत यांनी पुणे महानगरपालिकेचे




महाराष्ट्र शासनाच्या प्रशासकीय सेवेतील सर्व प्रशासकीय विभागातील साहित्यिक अधिकारी यांना दिला जाणारा मानाचा व प्रतिष्ठेचा साहित्य क्षेत्रातील उत्कृष्ट साहित्य कलाकृती पुरस्कार २०२६ चा पुरस्कार महाराष्ट्र पोलीस दलात स्थित कार्यरत नवी मुंबई खारघर क्राइमब्रांच मध्ये कार्यरत असलेले साहित्यिक मा. श्री उत्तमराव दासू तरकसे- आसरडोकर (महाराष्ट्र शासनाचा डॉ. बाबासाहेब आंबेडकर समाजभूषण पुरस्काराने सन्मानित ज्येष्ठ साहित्यिक कवी विचारवंत) यांना जागतिक मात्र भाषा दिनाच्या निमित्ताने पुणे महानगरपालिकेची (मराठी भाषा संवर्धन समिती) महाराष्ट्र शासनाच्या सर्व विभागाच्या प्रशासकीय सेवेतील वर्ग एक व दोन अधिकाऱ्यांना प्रशिक्षण देणारी शासनाची एकमेव संस्था यशोदा व सांस्कृतिक कार्यामध्ये अग्रगण्य असणारी पुणे शहरातील संस्था संवाद यांच्यावतीने पुणे येथील अत्यंत प्रतिष्ठेच्या वास्तुत म्हणजे बालगंधर्व नाट्यगृह पुणे या देशमुख (भा प्र से) मा श्री महेश भागवत(अतिरिक्त पोलीस महासंचालक कायदा व सुव्यवस्था तेलंगण राज्य) मा श्री ज्ञानेश्वर मुळे (सल्लागार राष्ट्रीय कौशल्य विकास महामंडळ भारत सरकार) माश्री राजेश पाटील (भा प्र से) मा श्री महेश (सचिव सहकार विभाग ओरिसा) मा श्री सुरेंद्रकुमार मानकोसकर (भा प्र से) मा राजीव नंदकर (भा प्र से) डॉक्टर किरण धांडे (भा प्र से)मा श्री वेंकटेश कल्याणकर यशदा ग्रंथ पुरस्कार वितरण समितीचे अधिकारी यांचे हस्ते साहित्यिक मा श्री उत्तमराव तरकसे यांना सदरचा पुरस्कार प्रदान करण्यात आला.

सदर कार्यक्रमाचे दिवशी साहित्यिक उत्तमराव तरकसे यांचा सर्वात लहान मुलगा कु. आयुष याचा १९ वा प्रकट दिन असल्याने सदरचा मानाचा व प्रतिष्ठेचा समजला जाणारा उत्कृष्ट साहित्यकृती पुरस्कार २०२६ हा पुरस्कार त्याच्या वाढदिवसानिमित्त त्यास समर्पित केल्याचे विचार मंचावरून जाहीर करत साहित्यिक तरकसे व महाराष्ट्र शासनाच्या सर्व प्रशासकीय विभागातील अधिकारी वर्ग एक व दोन यांना प्रशासकीय प्रशिक्षण देणारी संस्था यशदा व संवादच्या उत्कृष्ट साहित्य पुरस्काराकरिता नेमलेल्या निवड समितीच्या सर्व पदाधिकारी सदस्य व प्रशासकीय सर्व अधिकारी वर्गाचे सदर पुरस्काराकरिता माझ्या करपली भाकर

या कथासंग्रहाची निवड केल्याबद्दल सर्वांचे जाहीर मनापासून आभार मानले कार्यक्रमाचे सूत्रसंचालन खूपच उत्कृष्टपणे सादरीकरण मा श्री व्यंकटेश कल्याणकर यांनी केले सदरचे साहित्य संमेलन हे तीन दिवसाचे भरगच्च असे प्रेक्षक साहित्यिक वर्गाने उपस्थित राहून जल्लोसात साजरे झाले बालगंधर्व नाट्यगृहात तिन्ही दिवस प्रेक्षक साहित्यिक व पुणे जिल्ह्यातील एकूणच सर्व महाराष्ट्रातील सुज्ञ नागरिक व. साहित्यिक वर्गाने उपस्थित राहून प्रेक्षकांच्या प्रेमाने व उपस्थितीने सभागृह अगदीच फुलून गेला होता.

## कुसुमाग्रज यांनी महाराष्ट्राच्या सांस्कृतिक क्षेत्रामध्ये मोलाचे योगदान दिले -डॉ.कमलेश महाजन

छ.संभाजीनगर/ प्रतिनिधी :-कुसुमाग्रज यांनी महाराष्ट्राच्या सांस्कृतिक क्षेत्रात मोलाचे योगदान दिले असे प्रतिपादन डॉ. कमलेश महाजन यांनी वसंतराव नाईक महाविद्यालयात आयोजित 'मराठी भाषा गौरव दिन' व 'कवी कुसुमाग्रज' यांच्या जयंतीनिमित्त प्रमुख वक्ते म्हणून बोलताना केले. कुसुमाग्रज यांनी कथा, कविता, कादंबरी,नाटक आणि समीक्षा या वाड्.मय प्रकारात मोलाचे योगदान दिले



असून मराठी भाषा ही ज्ञानभाषा होण्यासाठी अथक परिश्रम घेतले. मराठी भाषेचा सन्मान वाढविण्यात ज्यांनी महत्वपूर्ण योगदान दिले, त्यात 'विवेकसिंधू' हे मराठी भाषेतील पहिले ग्रंथ लिहिणारे आद्यकवी मुकुंदराज यांचे आणि मराठी भाषेला सर्वप्रथम सन १९६५ मध्ये राजभाषेचा दर्जा देऊन तिच्या समृद्धीसाठी विशेष उपाययोजना करणारे महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री महानायक वसंतराव नाईक यांच्याही ऐतिहासिक योगदानाचे या निमित्ताने स्मरण केले पाहिजे असे डॉ.महाजन म्हणाले या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.संजय शिंदे होते कार्यक्रमाच्या सुरुवातीला कवी कुसुमाग्रज यांच्या प्रतिमेश पुष्पहार अर्पण करण्यात आला अध्यक्षीय समारोप करताना डॉ. संजय शिंदे म्हणाले की,मराठी भाषेचा उगम सातवाहन काळात नववया शतकापासून झालेला आहे .या भाषेची निर्मिती संस्कृत पासून झाली असे सर्व साधारण पणे मानले जाते.पैठण येथील सातवाहन साम्राज्याने प्रशासनात महाराठी भाषेचा सर्वप्रथम वापर केला. नंतर देवगिरीच्या यादव काळात मराठी भाषेची समृद्धी झाली. इ.स. बाराशे अष्टोत्तर मध्ये म्हाईमभट यांनी लिळा चरित्र लिहिले आणि संत ज्ञानेश्वरांनी ज्ञानेश्वरी लिहिली. संत एकनाथ महाराजांनी मराठी भाषेतून भारुडे लिहिली. मराठी भाषा अनेक संतांच्या कीर्तनांनी, ओव्यांनी तशीच भजनांनी सजली आहे. या भाषेला अनेक मराठी साहित्यिकांच्या लेखनींची समृध्दी आणि संपन्नता लाभलेली आहे. हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराजांनी मराठी भाषेचे व संस्कृतीचे संरक्षण केले. महाराजांनी मराठी भाषेसाठी पहिला राजकोश तयार केला.

आत्ताच्या स्पर्धात्मक जगात टिकून राहण्यासाठी मराठी भाषेसोबत इतर भाषा येणे सुद्धा गरजेचे असले तरी आपल्या मराठी भाषेचे महत्व टिकवून ठेवणे देखील तेवढेच आवश्यक आहे. मराठी भाषेतील साहित्य समृद्ध असल्याने येणाऱ्या पिढील मराठी साहित्याची ओळख करुन दिली पाहिजे. संतांनी, लेखकांनी, इतिहासकरांनी आपल्या भाषेत दिलेलं ज्ञान मिळवणे अत्यंत गरजेचे आहे.असे डॉ . शिंदे म्हणाले या निमित्ताने ग्रंथालयात पुस्तक प्रदर्शन भरविण्यात आले होते तसेच विद्यार्थी स्टाफसाठी ऑनलाइन प्रश्नमंजुषा स्पर्धेचे आयोजनही करण्यात आले या कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी सर्व प्राध्यापक, कर्मचाऱ्यांनी सहकार्य केले, कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. शिवचरण गिरी यांनी केले तर आभार प्रदर्शन डॉ वीणा कांबळे यांनी मानले

# 'प्रतिबंधक कक्ष' पुढाकार योग्य, पण परिणामांची खरी परीक्षा बाकी

लातूर जिल्हा पोलीस दलाने गुन्हेगारीवर प्रभावी नियंत्रण मिळवण्यासाठी पोलीस अधीक्षक कार्यालयात स्वतंत्र प्रतिबंधक कक्ष (झीर्शीशपींळींश उशश्रश्र) स्थापन करण्याचा निर्णय घेतला आहे. कायदा व सुव्यवस्था अबाधित राखणे, सराईत व वारंवार गुन्हे करणाऱ्या प्रवृत्तीवर आळा घालणे आणि नागरिकांना सुरक्षित व निर्भय वातावरण उपलब्ध करून देणे हा या उपक्रमामागील उद्देश आहे. तत्त्वतः पाहता, गुन्हा घडल्यानंतर कारवाई करण्यापेक्षा गुन्हा होण्यापूर्वीच प्रतिबंध घालण्याची ही आधुनिक पोलिसिंगची दिशा आहे आणि त्या दृष्टीने लातूर पोलिसांचा हा पुढाकार निश्चितच सकारात्मक म्हणावा लागेल.

जिल्हा पोलिसांनी इछऊ, महाराष्ट्र पोलीस अधिनियम, चझऊ यांसारख्या विविध कायद्यांच्या तरतुदींअंतर्गत मोठ्या प्रमाणावर प्रतिबंधात्मक कारवाई केल्याचे सांगितले आहे. हजारोंच्या संख्येने व्यक्तींवर नोटिसा, तडीपारी प्रस्ताव, जामीन कारवाई आणि स्थानबद्धतेच्या प्रक्रिया सुरू झाल्याचे आकडे दर्शवतात. प्रशासनाच्या दृष्टीने ही सक्रियता महत्त्वाची असली, तरी केवळ आकडे प्रभावी असणे म्हणजे गुन्हेगारीवर खऱ्या अर्थाने नियंत्रण आले असे होत नाही.

खरी कसोटी वेगळी आहे. जिल्ह्यातील मारामाऱ्या, जबरी वसुली, टोळीगत गुन्हे, मालमत्तेविरुद्धचे अपराध आणि सामाजिक तणावाच्या घटनांमध्ये प्रत्यक्ष घट झाली का? वारंवार गुन्हे करणाऱ्यांची पुनरावृत्ती कमी झाली का? सर्वसामान्य नागरिक रात्री निर्भयपणे वावरू लागले का? या प्रश्नांची सकारात्मक उत्तरे मिळाली तरच प्रतिबंधक कक्ष प्रभावी ठरल्याचे म्हणता येईल.

प्रतिबंधात्मक कायद्यांचा वापर हा स्वभावतः कठोर असतो. संशय, संभाव्यता आणि सार्वजनिक सुव्यवस्था या संकल्पनांवर आधारित कारवाई करताना कायदेशीर बारकावे काटेकोरपणे पाळणे अत्यंत आवश्यक आहे. अन्यथा निरपराध व्यक्तींना नोटिसा, तडीपारी किंवा बंधपत्रांच्या प्रक्रियेला सामोरे जावे लागण्याची शक्यता नाकारता येत नाही. पोलिसांची कडक कारवाई आणि नागरिकांचे नागरी हक्क यामध्ये संतुलन राखणे हीच या यंत्रणेची खरी परीक्षा ठरणार आहे.

याशिवाय, मनुष्यबळ आणि संसाधनांचाही प्रश्न महत्त्वाचा आहे. संपूर्ण जिल्ह्यातील सराईत गुन्हेगारांवर लक्ष ठेवणे, त्यांचे प्रोफाइलिंग करणे, प्रस्ताव तयार करणे, न्यायालयीन प्रक्रिया पाठपुरावा करणे आणि स्थानिक पोलिसांशी समन्वय ठेवणे ही अत्यंत व्यापक जबाबदारी आहे. मर्यादित मनुष्यबळावर चालणारी यंत्रणा दीर्घकाळ प्रभावी राहण्यासाठी तिला तांत्रिक साधने, डेटा विश्लेषण आणि सातत्यपूर्ण गुप्त माहितीची जोड आवश्यक असेल.

एक सकारात्मक बाब म्हणजे प्रतिबंधक कारवाईला संस्थात्मक रूप देण्याचा प्रयत्न. यामुळे वेगवेगळ्या पोलीस ठाण्यांतील कारवाया एकाच छत्राखाली येऊ शकतात आणि सराईत गुन्हेगारांवर एकसंध धोरण राबवता येऊ शकते. जर या कक्षाने डेटा-आधारित नियोजन, हॉटस्पॉट ओळख, टोळीगत गुन्हेगारीचे मॅपिंग आणि पुनरावृत्ती गुन्हेगारांवर लक्ष केंद्रित केले, तर त्याचे दूरगामी परिणाम दिसू शकतात.

परंतु यशासाठी आणखी एक घटक तितकाच आवश्यक आहे लोकसहभाग. नागरिकांचा विश्वास, माहिती देण्याची तयारी आणि पोलिसांबद्दलची सकारात्मक भावना वाढली तरच प्रतिबंधात्मक पोलिसिंग प्रभावी ठरते. केवळ कडक कारवाईपेक्षा विश्वासार्ह संवाद आणि दृश्यमान उपस्थितीही तितकीच महत्त्वाची असते.

एकंदरीत, लातूर पोलिसांनी प्रतिबंधक कक्ष स्थापन करून गुन्हेगारीविरुद्ध आघाडी घेण्याचा प्रयत्न केला आहे, हे निश्चितच कौतुकास्पद आहे. मात्र, कोणतीही यंत्रणा तिच्या उद्दिष्टांपेक्षा परिणामांवर मोजली जाते. येत्या काळात गुन्हेगारीतील प्रत्यक्ष घट, न्यायालयीन प्रक्रियेत टिकणाऱ्या कारवाया आणि नागरिकांच्या वाढत्या सुरक्षिततेच्या भावनेतूनच या उपक्रमाचे खरे मूल्यमापन होईल.

सध्या तरी दिशा योग्य आहे आता अपेक्षा आहे ती सातत्य, पारदर्शकता आणि ठोस परिणामांची.

# सार्थवाह - प्राचीन व्यापारी तांड्यांची संघटना

'सार्थ' म्हणजे समूहाने केलेला प्रवास आणि 'वाह' म्हणजे तो वाहून नेणारा. प्राचीन काळी प्रवासाची साधने मर्यादित होती आणि रस्ते चोरांपासून तसेच हिंस्त्र श्वापदांपासून असुरक्षित होते. त्यामुळे व्यापारी कधीही एकटे प्रवास न करता समूहाने प्रवास करत, ज्याला 'सार्थ' म्हटले जाई. या सार्थवाहांचे नेतृत्व करणाऱ्या व्यक्तीला 'सार्थवाह' ही पदवी दिली जाई. नाणेघाटातील शिलालेखात ज्या समृद्धीचे वर्णन आहे, ती याच सार्थवाहांच्या कष्टाचे फळ होती.

सार्थवाहाची निवड ही त्याच्या अनुभवावर आणि भूगोलाच्या ज्ञानावर केली जाई. त्याला विविध प्रांतांच्या भाषा, नद्यांचे प्रवाह, नक्षत्रांचे ज्ञान (रात्रीच्या प्रवासासाठी) आणि शस्त्रास्त्रांची माहिती असणे अनिवार्य असे. सार्थवाहासोबत केवळ व्यापारीच नसत, तर त्या तांड्यात रक्षक , बैलगाड्या दुरुस्त करणारे सुतार, बैलांची काळजी घेणारे सेवक, स्वयंपाकी आणि प्रसंगी वैद्यांचाही समावेश असे. तांड्यामध्ये शेकडो बैलगाड्या, गाढवे, घोडे आणि उंट असत. नाणेघाटासारख्या चढणीच्या मार्गावर गाड्या वळवताना सार्थवाहाला अत्यंत शिस्त पाळावी लागे. तांड्याचा प्रवास पहाटे सुरू व्हायचा आणि दुपारच्या उन्हात तो थांबवला जाई. रात्रीच्या वेळी हे तांडे 'सार्थवेध' (एक प्रकारचे तात्पुरते शिबिर) लावून मुक्काम करत. या काळात संरक्षणासाठी तांड्याभोवती गाड्यांचे वर्तुळ करून मध्ये घोडे आणि बैल बांधले जात.

या तांड्यांचे स्वतःचे नियम असत, ज्यांना 'समय' म्हटले जाई. जर एखाद्या व्यापाऱ्याने तांड्याचे नियम मोडले, तर त्याला समूहातून बाहेर काढले जाई. नाणेघाटातील गुहेमध्ये जे पाण्याचे टाके आणि बसण्यासाठी ओटे आहेत, ते याच सार्थवाहांच्या विश्रांतीसाठी सातवाहन राजांनी बांधले होते. सार्थवाह जेव्हा नाणेघाटाच्या माथ्यावर पोहोचत, तेव्हा त्यांना 'जकात' शुल्क भरावी लागे. ही जकात केवळ पैशांच्या स्वरूपात नसे, तर ती मालाच्या स्वरूपातही घेतली जाई. घाटावरील त्या मोठ्या दगडी रांजणात ही जकात जमा केली जाई. हे सार्थवाह केवळ मालच वाहत नसत, तर ते एका संस्कृतीचे दुसऱ्या संस्कृतीशी मिलन घडवून आणत. यवन (रोमन) व्यापाऱ्यांनी दिलेली दाने याच सार्थवाहांच्या माध्यमातून शक्य झाली. म्हणूनच सातवाहन काळातील अर्थव्यवस्थेचा सार्थवाह हा 'कणा' होता. त्यांच्या सुरक्षिततेसाठी राजाकडून 'पथपाल' (रस्ते रक्षक) नेमले जात, ज्याचा खर्च व्यापारावर लावलेल्या करातून केला जाई.

प्राचीन व्यापारी मार्ग आणि नाणेघाटाची रचना :-प्राचीन भारतातील व्यापारी मार्ग हे प्रामुख्याने नैसर्गिक भूगोलाचा आधार घेऊन बनवले होते. उत्तरपथ आणि दक्षिणपथ हे दोन मुख्य महामार्ग होते. नाणेघाट हा दक्षिणपथाचा एक अत्यंत महत्त्वाचा भाग होता, जो 'प्रतिष्ठान' (पैठण) या राजधानीला पश्चिमेकडील 'कल्याण' या समृद्ध बंदराशी जोडत असे. या मार्गाला 'कारवान मार्ग' असेही म्हटले जाई. नाणेघाटाची रचना ही केवळ एक नैसर्गिक खिंड नसून, ती मानवनिर्मित अभियांत्रिकीचा चमत्कार आहे. घाटाचा रस्ता दगडात अशा प्रकारे कोरला आहे की, त्यावरून एकावेळी दोन बैलगाड्या सहज जाऊ शकतील.

या मार्गावर ठराविक अंतरावर 'विश्रामस्थाने' आणि 'पाण्याचे टाके' खोदलेली होती. नाणेघाटातील शिलालेख ज्या लेणीत आहे, ती लेणी प्रवाशांसाठी विश्रामगृह म्हणून वापरली जात असे. व्यापारी मार्गावर सुरक्षिततेसाठी डोंगराच्या कपारीत टेहळणी बुरुज असत. पावसाळ्यात हे मार्ग अत्यंत निसरडे होत, त्यामुळे व्यापारी शक्यतो चातुर्मासात प्रवास टाळत असत. नाणेघाटातील रस्त्यावर आजही बैलगाड्यांच्या चाकांच्या ज्या खुणा दिसतात, त्यावरून त्या काळातील रहदारीची कल्पना येते. या मार्गावरून पश्चिमेकडे कापूस, तलम कापड, मिरी आणि मौल्यवान खडे पाठवले जात, तर पूर्वेकडे (देशावर) सोने, चांदी, तांबे आणि रोमन मद्य (ाहिरश) आणले जाई. (रोमन ॲम्फोरा सविस्तर माहिती पुढील टप्प्यात)

या मार्गाचे महत्त्व इतके होते की, सातवाहन राजांनी नाणेघाटाच्या मुखाशीच आपले 'प्रतिमा दालन' उभारले होते, जेणेकरून येणाऱ्या-जाणाऱ्या प्रत्येक परदेशी आणि स्वदेशी व्यापाऱ्याला सातवाहन सत्तेच्या वैभवाची जाणीव व्हावी. या मार्गावर केवळ व्यापारीच नाही, तर बौद्ध भिक्खू, कलाकार आणि राजदूतही प्रवास करत. त्यामुळे हा मार्ग केवळ व्यापाराचा मार्ग न राहता तो 'ज्ञानाचा आणि संस्कृतीचा मार्ग' बनला होता. डॉ. मोतीचंद्र यांच्या मते, या मार्गावर असलेल्या गावांना 'द्रोणमुख' किंवा 'पट्टण' म्हटले जाई, जिथे मालाची खरेदी-विक्री होत असे. जुन्नर हे असेच एक मोठे व्यापारी केंद्र होते, जिथे नाणेघाटातून आलेला माल साठवला जाई आणि पुढे देशभर वितरित केला जाई. या संपूर्ण व्यवस्थेचे नियोजन इतके अचूक होते की, शेकडो वर्षे हा मार्ग अखंडितपणे सुरू राहिला.

नाणेघाटातील आंतरराष्ट्रीय व्यापार आणि त्यातील रोमन ॲम्फोरा व बैलगाड्यांची विशेष रचना-रोमन ॲम्फोरा - जागतिक व्यापाराचे तांत्रिक साधन-रोमन 'ॲम्फोरा' हा शब्द ग्रीक 'ॲम्फिफोरेओस' (ज्याचा अर्थ दोन्ही बाजूंनी उचलण्याचे साधन असा होतो.) या शब्दावरून आला आहे. सातवाहन काळातील नाणेघाट हा केवळ एक डोंगरमार्ग नव्हता, तर तो जागतिक बाजारपेठेला जोडणारा मुख्य महामार्ग होता. या मार्गावरून येणाऱ्या मालामध्ये रोमन साम्राज्यातील 'मद्य' आणि 'ऑलिव्ह ऑइल'ला (जैतूनचे तेल) प्रचंड मागणी होती. ही द्रव्ये वाहून नेण्यासाठी ॲम्फोरा हे त्या काळातील सर्वात प्रगत 'वेष्टन' (पॅकेजिंग) तंत्रज्ञान होते.

ॲम्फोराची रचना ही निव्वळ सौंदर्यासाठी नसून ती पूर्णपणे व्यावहारिक हेतूने केलेली होती. हे घडे प्रामुख्याने भाजलेल्या तांबड्या मातीचे बनलेले असत. यांचा आकार दंडगोलाकार असून वरचा भाग अरुंद मानेचा असे. या मानेच्या दोन्ही बाजूंना भक्कम मातीची हाताळी (हँडल्स) असत, ज्यामुळे दोन हमाल तो जड घडा सहज उचलू शकत. ॲम्फोराच्या



आतील बाजूला 'रेझिन' नावाच्या नैसर्गिक डिंकाचा किंवा डांबराचा थर लावला जाई. हा थर लावल्यामुळे मातीची सच्छिद्रता नष्ट व्हायची आणि महागडे मद्य किंवा तेल पाझरून वाया जात नसे.

नाणेघाट आणि जुन्नरमधील उत्खननात जे ॲम्फोराचे अवशेष सापडले आहेत, ते प्रामुख्याने 'ड्रेसल २-४' या प्रकारातील आहेत. हे घडे आकाराने लांबट आणि सुबक असत. रोमन साम्राज्यातून जहाजाद्वारे हे ॲम्फोरा कल्याण बंदरात येत. तिथे जहाजाच्या तळात हे घडे वाळूच्या थरात त्यांचे अणकुचीदार तळ रुतवून उभे केले जात. या अणकुचीदार तळाचा फायदा असा होता की, समुद्राच्या लाटांमुळे जहाज कितीही डचमळले तरी हे घडे एकमेकांवर आदळत नसत. या अणकुचीदार तळाला तांत्रिक भाषेत 'टो' असेही म्हटले जाई, जो वाहतुकीदरम्यान 'तिसरी पकड' म्हणून काम करत असे.

ॲम्फोराच्या अंगावर अनेक खुणा असत, ज्या व्यापाराची पारदर्शकता सिद्ध करतात. सील ॲम्फोरा ओला असतानाच त्याच्या हँडलवर उत्पादकाच्या नावाची मोहोर उमटवली जाई .

या ॲम्फोराच्या हाताळीवर अनेकदा रोमन कुंभारांचे किंवा व्यापाऱ्यांचे शिक्के असत. याला पुरातत्वशास्त्रामध्ये 'टिट्युली पिक्टी' असेही म्हणतात टिट्युली पिक्टी हे ॲम्फोराच्या मानेवर शाईने लिहिलेले तपशील असत यावरून तो माल कोणत्या रोमन प्रांतातून आला आहे ? त्यातील मालाचे निव्वळ वजन किती आहे ? आणि त्यावर कर भरला आहे का ? याची माहिती मिळत असे. अशा प्रकारे ॲम्फोरा हा प्राचीन काळातील एक प्रकारचा 'सांकेतिक ओळख' (बारकोड) असलेला मालवाहतूक डबा होता. नाणेघाटातील शिलालेखात ज्या समृद्धीचा उल्लेख आहे, त्यामागे या ॲम्फोराच्या माध्यमातून झालेला कोट्यवधी कार्षापणांचा व्यापार कारणीभूत होता.

जुन्नर आणि नेवास येथे ॲम्फोराचे शेकडो तुकडे सापडले आहेत.

अरिकामेडू (पुदुच्चेरी) येथील उत्खननात सर्वात प्रथम रोमन व्यापाराचे पुरावे मिळाले, ज्याची तुलना नाणेघाटाशी केली जाते. पट्टनम (केरळ) हे प्राचीन 'मुझिरीस' बंदर असावे, जिथून माल नाणेघाटाकडे वळवला जाई.

एकदा मद्य किंवा तेल संपले की ॲम्फोरा फेकले जात नसत.

पुनर्वापर भारतात या भांड्यांचा वापर धान्य साठवण्यासाठी, ताक घुसळण्यासाठी किंवा घरांच्या छतावर उष्णतारोधक म्हणून केला जाई.

फुटलेले अवशेष फुटलेल्या ॲम्फोराच्या तुकड्यांचा वापर रस्ते बनवण्यासाठी किंवा मातीचे खड्डे भरण्यासाठी केला जाई.

नाणेघाटातील बैलगाड्यांची रचना आणि सार्थ-नियोजन :कल्याण बंदरातून उतरवलेले हे जड ॲम्फोरा नाणेघाटाच्या खडकाळ चढणीवरून जुन्नरकडे नेणे हे त्या काळातील अभियांत्रिकीचे मोठे आव्हान होते. साध्या बैलगाड्यांवर हे नाजूक घडे ठेवले तर ते घाटातील धक्क्यांनी फुटण्याची शक्यता होती. यासाठी सातवाहनकालीन व्यापाऱ्यांनी बैलगाड्यांच्या रचनेत क्रांतिकारक बदल केले होते.

या गाड्यांच्या तळाच्या फळ्यांमध्ये ॲम्फोराच्या निमुळत्या तळाच्या आकाराची वर्तुळाकार छिद्रे पाडली जात. याला 'खाचांची मांडणी' (रॅक सिस्टीम) असे म्हणता येईल. ॲम्फोराचा तळ या छिद्रात घट्ट बसवला जाई, ज्यामुळे तो उभा स्थितीत स्थिर राही. याच्या वरच्या बाजूला दुसरी एक लाकडी चौकट असे, जी ॲम्फोराच्या मानेला आधार देत असे. या संरचनेमुळे घाटाच्या तीव्र वळणांवर किंवा चढणीवर गाड्या तिरप्या झाल्या तरी घडे सांडत नसत किंवा फुटत नसत. दोन घड्यांच्या मधल्या जागेत सुके गवत, भाताचा पेंढा किंवा चामड्याच्या पट्ट्यांचे 'मृदू आच्छादन' (कुशनिंग) भरले जाई, जेणेकरून धक्क्यांची तीव्रता कमी होईल.

नाणेघाटातील रस्ता हा काही ठिकाणी जाणीवपूर्वक ५ ते ६ फूट रुंद आणि सपाट कोरला आहे. कातळात बैलगाड्यांच्या चाकांच्या ज्या खोल खुणा आजही दिसतात, त्यावरून हे स्पष्ट होते की, या मार्गावर वाहतुकीची प्रचंड वर्दळ होती. चाकांमधील हे अंतर संपूर्ण मार्गावर समान होते, याचा अर्थ त्या काळी बैलगाड्यांच्या आकाराचे 'प्रमाणीकरण' झाले होते. घाटातील कठीण चढणीवर बैलांना ओझे ओढता यावे म्हणून रस्त्यावर काही ठिकाणी खोबण्या केल्या होत्या, ज्यामुळे बैलांच्या खुरांना चांगली पकड मिळत असे.

जेव्हा हे तांडे नाणेघाटाच्या माथ्यावर पोहोचत, तेव्हा तिथे असलेल्या जकात नाक्यावर प्रत्येक ॲम्फोराची मोजणी होत असे. ॲम्फोराचा आकार आणि त्यातील मालाचा प्रकार (उदा. मद्य की तेल) यानुसार जकात ठरवली जाई. नाणेघाटातील तो प्रसिद्ध 'दगडी रांजण' हा अशाच प्रकारे गोळा केलेली जकात किंवा नाणी साठवण्यासाठी वापरला जात असावा. सार्थवाह (तांडा प्रमुख) या सर्व वाहतुकीचे आणि सार्थ-नियोजनाचे काम पाहत असे. घाटाच्या पायथ्याशी आणि माथ्यावर असलेल्या पाण्याचे टाके आणि लेण्यांमधील विश्रामगृहे ही या सार्थ-नियोजनाचाच एक भाग होती. बैलगाड्यांची ही प्रगत रचना आणि मालाचे नियोजन यामुळेच रोमन साम्राज्यातील सोने भारताच्या दिशेने खेचले जात होते. नाणेघाटातील हा व्यापार केवळ वस्तूंची देवाणघेवाण नव्हता, तर तो तंत्रज्ञान आणि संस्कृतीचा संगम होता.

- माधुरी चतुर

# डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी दिलेला धम्म क्रांती चा आधुनिक.दृष्टीकोन

डॉ बाबासाहेब आंबेडकर ,यांच्या नावाचा उद्घोष करत असताना, संविधानाच्या माध्यमातून संविधान बदलण्याचा घाट घातला जात आहे. अशा वेळी प्रत्येक भारतीय नागरिक म्हणून ओळखले जातात त्यांनी डोळसपणे परिस्थिती हाताळली पाहिजे. संविधान बदलताना दिसणार नाहीत, परंतु ते बदलत जाईल.

विविध प्रकारच्या डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी केलेल्या क्रांतिकारक कृतीची परिचर्चा होणार आहे.

सध्या बुध्द धर्माचा प्रसार होऊन बुध्दानुयायांची संख्या अशी वाढेल हा एक विचार बुध्दधर्मीय जनतेच्या मनामध्ये आढळून येतो. धर्मप्रसाराच्या ह्या विचारात नवीन किंवा आक्षेपार्ह असे काही नाही. मात्र अशा धर्मप्रसारामुळे बुध्दधर्मियांचा अहंभाव सुखावला जातो व त्याचवेळी आपल्या सत्ताक्षेत्राला ओहोटी लागलेली पाहून हिंदू धर्मीयांचे मन विषण्ण होते. पण केवळ बुध्द धर्माचा स्वीकार केल्याने कोणत्याही माणसास फार मोठे परिवर्तन होऊन त्याची उन्नती होते अशातला भाग नाही. केवळ धर्माचे अंधानुकरण करत माणसातील दोष नष्ट होत नाहीत. त्याच्या बुध्दीचा विकास होत नाही, पण मनुष्य चिकित्सक बुध्दीचा असेल तर नवीन श्रध्देचा उदय होऊन तों जीवनाकडे नवीन दृष्टीने पाहू शकतो एवढे मात्र खरे.धर्माच्या ज्ञानाबाबतही लोकांमध्ये चुकीच्या कल्पना आढळतात. धर्मज्ञानामुळे पुण्यप्राप्ती होते अशी असंख्य लोकांची कल्पना असल्यामुळे ते आपल्या मनातील भीती घालवून देऊन पुण्य प्राप्त व्हावे यासाठी धर्माचा आश्रय घेतात. धर्मासंबंधीचा हा दृष्टीकोन समाजात अंधश्रद्धांची वृद्धी करण्यास कारणीभूत होतो व त्यामुळे समाजाचे पतन होते. धर्मामुळे मनुष्याचा निकोप जीवनदृष्टीचा विकास होऊन शील संवर्धन झाले पाहिजे. हे साध्य होण्यास माणसाचे मन कोणत्या कारणामुळे संकुचित बनते व काय केले असता मनाचा विकास होतो याचे अनुभवजन्य ज्ञान मनुष्यास आले पाहिजे.एकेकाळी बुध्द धर्म भारतात सर्वत्र पसरला असून तो वैभवाच्या शिखरावर होता, असे असूनही मध्यंतरीच्या काळात या धर्माचे भारतातून उच्चाटन झाले ही वस्तुस्थिती आहे. सध्याच्या काळी भारतात बुध्द धर्माच्या पुनरुज्जीवनाचे कार्य चालू असताना भारतात पूर्वी बुध्द धर्माचा ऱ्हास व उच्चाटन का झाले व सध्याच्या काळी हासाची कारणे भारतात कितपत विद्यमान आहेत हे पाहणे महत्त्वाचे आहे.पुष्कळांची अशी धारणा असते की, व्यक्तीचा किंवा समाजाचा विकास काही विशिष्ट नियमाचे पालन केल्याने होतो, असे म्हणणे अंशतःच बरोबर आहे. प्राचीन काळी समाज स्थितीशील होता त्या काळी लोकांना काही ठराविक नियमात अडकवून त्यांचे समाधान करणे शक्य होते. पण सध्याचा समाज गतीशील आहे. आजच्या काळी समाजात फार मोठ्या प्रमाणावर स्थित्यंतरे होत आहेत अशावेळी समाजातील लोकांनी आपल्या समोर कोणती आव्हाने आहेत व त्याना आपण किती चोख उत्तर देऊ शकतो ह्याचा विचार केला पाहिजे. जो समाज आत्मकेंद्रित व अल्पसंतुष्ट असतो व स्वतः समोरील आव्हानांचे प्रत्युत्तर देऊ शकत नाही त्या समाजाची पिछेहाट झाल्याशिवाय राहात नाही.भारताने लोकशाही राज्यपध्दती स्वीकारली आहे. भारतात लोकशाहीच्या विकासासाठी जनतेत समता, स्वातंत्र्य, बंधुत्व या गुणांचा विकास झाला पाहिजे. जेथे जनतेत हे गुण आढळून येत नाहीत तेथे लोकशाही टिकून राहात नाही. ह्या गुणांच्या विकासासाठी बुध्द धर्म सहाय्यक होऊ शकतो. ही गोष्ट डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या धर्माच्या पाठीशी होती. दुर्दैवाने हा विचार समजून घेण्याची पात्रता मागास समाजाच्या पुढाऱ्यात नाही असे आढळून आले आहे. येथील प्रत्येक पुढाऱ्याने आपण स्वतः धर्माचे आश्रयदाते आहो असे मानून स्वतःभोवती बुध्दानुयायाची एकेक टोळी निर्माण केली, व ते स्वतःच्या स्वार्थासाठी परस्परात भांडत आहेत. या लोकांच्या स्वार्थी राजकारणापासून बुध्दानुयायाची सुटका केल्याशिवाय भारतात बुध्द धर्माचा विकास होणे शक्य नाही.धर्माचे सामाजिक कार्य कोणत्या स्वरुपाचे असावे हे समजण्यासाठी प्राचीन काळी भारतात बुध्द धर्माचा ऱ्हास का झाला याची कारणे लक्षात घेतली पाहिजेत. ह्या कारणांपैकी एक कारण असे दिसते की, त्या काळी भिक्खू वर्गाचे धर्माच्या सामाजिक अंगाकडे दुर्लक्ष झाले. त्याकाळी धर्माची सुत्रे वृध्द भिक्खूंच्या हाती होती व भिक्खूंची सत्ता मुख्यतः त्यांच्या  विहारामध्ये केंद्रित झाली होती. बुध्द धर्म सन्यासपर आहे असे मानून हे भिक्खु आपल्या ध्यानातच मग्न राहिले. भगवान बुध्दाने आपल्या हयातीत चातुर्वर्ण यज्ञसंस्था व अन्य लोक-भ्रमावर हल्ले चढवून आपल्या शिकवणूकीशी सुसंगत असे समाज परिवर्तन घडवून आणण्याचा प्रयत्न केला.या प्रकारचे कार्य त्याच्या शिष्यांकडून झाले नाही. या बुध्द भिक्खुनी लोकांमध्ये मिसळून त्यांच्यातील भ्रामक रुढी व परंपरा घालवून देण्याचे कार्य केले असते तर लोक बुध्दानुयायी राहिले असते. त्यांनी बुध्द धर्माचा त्याग केला नसता. पण बुध्द भिक्खूनी धर्माच्या तात्विक उपदेशावरच आपले लक्ष केंद्रित केले यामुळे जनतेच्या हिंदू धर्मापासून स्विकारलेल्या संस्कारात फरक पडला नाही. लोक हिंदूधर्माच्या पूर्वापार चालत आलेल्या सणास व मिथला चिकटून राहिले व जेव्हा यवनानी भिक्खु संघावर हल्ले करुन त्यांना नेस्तनाबूत केले. त्यावेळी लोकांना कोणत्याही प्रकारचा आधार नसल्यामुळे त्यांनी हिंदूधर्माचे विधी व आचार यांचा पूर्णपणे स्वीकार केला.भारतात बुध्द धर्माचा ऱ्हास होऊन त्याचे उच्चाटन झाले. त्याचे महत्त्वाचे कारण म्हणजे बुध्द भिक्खु प्रज्ञा व शील या दोन्ही बाबतीत मागे पडले हे आहे, असे सांगितले जाते त्यात बरेच तथ्य असावे. भारतात ८ व्या शतकाच्या सुमारास हिंदू धर्माच्या तंत्रशास्त्राचा बुध्द धर्मात शिरकाव झाला व त्यामुळे भिक्खु वर्गात व जनतेत दुराचार वाढीस लागला. बुध्द भिक्खु आपल्या ज्ञानातही मागे पडले. शंकराचार्याच्या काळी दुसऱ्या धर्माच्या लोकांना जिंकण्याचे धार्मिक वादविवाद हे एक प्रमुख साधन होते. ह्या वादविवादात जो यशस्वी होई त्याचा धर्म श्रेष्ठ अशी लोकांची समजूत होत असे. त्या काळी शंकराचार्य व कुमारील भट्ट यानी बुध्द धर्मावर हल्ले चढविले हे परंतु लावण्याच्या बाबतीत बुध्द भिक्खु थिटे पडले असे दिसते. वरील घटनेवरुन धर्माच्या विकासासाठी धर्माचार्यांचे ज्ञान अध्यावत असले पाहिजे व त्यांनी अन्य धर्मीयांशी वाद झाल्यास त्यात यशस्वी होण्याची तयारी ठेवली पाहिजे हे स्पष्ट होते.भारतातील जुन्या काळच्या भिक्खुची दुराग्रही व शब्दप्रामाण्यवादी दृष्टी जगातील सध्याच्या बुध्द भिक्खुतही आढळून येते. आजच्या विज्ञानाच्या युगात जगातील भिक्खु वर्ग पूर्वीच्याच नियमांशी चिकटून राहातो. त्याच्या प्रवाह पतीततेचे एक लक्षण म्हणजे अडीच हजार भारतातील जुन्या काळच्या भिक्खुची दुराग्रही व शब्दप्रामाण्यवादी दृष्टी जगातील सध्याच्या बुध्द भिक्खुतही आढळून येते. आजच्या विज्ञानाच्या युगात जगातील भिक्खु वर्ग पूर्वीच्याच नियमांशी चिकटून राहातो. त्याच्या प्रवाह पतीततेचे एक लक्षण म्हणजे अडीच हजार वर्षापूर्वी बुध्दाने शिस्तीचे जे नियम घालून दिले त्याचे पालन करणे. तो धर्माचा मूळ गाभा सोडून देतो व विशिष्ट वस्त्रे धारण करणे. एक वेळ जेवण करणे यासारख्या बाह्य गोष्टीस चिकटून राहातो, तो पैशाला स्पर्श करणार नाही. बँकेत गेला असता पैशाला स्पर्श होऊ नये म्हणून तो पैसे पाकिटातून (शर्पीशश्रेशि) घेतो, पण पैशावर मात्र त्याचा अधिकार असतो. तो धर्मज्ञान दुसऱ्याला देतो पण स्वतःमात्र कोरड्या पाषाणाप्रमाणे असतो. तो धर्मविधीत रस घेतो पण वैज्ञानिक दृष्टीकोन म्हणजे काय ते त्याला समजत नाही. तो केवळ बुध्दावर श्रध्दा ठेवतो व त्यामुळे पुण्य प्राप्त होईल अशा भ्रमात राहतो. धर्माचरण करणाऱ्या जीवनात पुढे अशी स्थिती येते की त्यास धर्मविधीची (ठळींशी : उशीशोपळशी) ची आवश्यकता वाटत नाही पण तो त्यांचा त्याग करतो. या स्थितीस 'थोता पत्र' असे नाव आहे. पण बहुसंख्य बुध्द भिक्खूंच्या जीवनात ही स्थिती आलेली नसते. ते स्वतःला धर्मविधीत गोवून घेतात. लोकांना त्याचे महत्त्व सांगून जीवन जगतात. त्यामुळे लोकांच्या जीवनात प्रज्ञा, शील व करुणा यांचा विकास होऊ शकत नाही.डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना भिक्खु संघाचे जीर्ण रुढीस चिकटून राहण्याचे कार्य पसंत नव्हते. सर्वसाधारण बुध्द भिक्खु 'ध्यानात व आळसात' वेळ काढतो; त्यामुळे तो समाजसेवेचे कार्य करीत नाही अशी त्यांची तक्रार होती. भिक्खु संघाने क्रियाशील बनून समाज जागृतीचे कार्य करावे असे त्यांना वाटे. भिक्खुनी समाजात समता, स्वातंत्र्य व बंधुत्व निर्माण करण्याचे कार्य हाती घेतले तर लोकशाहीला पोषक वातावरण निर्माण होईल इतकेच नव्हे तर त्यामुळे आशिया खंडातील साम्यवादाला परिणामकारक शह देता येईल, असा त्यांचा कयास होता. त्यांना बुध्द धर्माचा मार्टिन ल्युथर बनायचे होते. त्यांच्या अकाली मृत्यूमुळे हे कार्य मागे पडले. पण बुध्द धर्माबद्दल आस्था बाळगणाऱ्यांनी हे कार्य सध्याच्या परिस्थितीत कोणत्या प्रकारे करता येईल, याचे चिंतन केले पाहिजे.सध्या दलित समाजात साम्यवादाबद्दल विलक्षण आकर्षण आढळून येते. सध्याच्या जगात अर्थाला महत्व आहे व आर्थिक दृष्ट्या पिडित शेतकरी व मजूर यांचे जीवनमान उंच करावयाचे असेल तर साम्यवादाला पर्याय नाही अशी अनेकांची समजूत होऊन बसली आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना सुध्दा शेतकरी व मजूर यांची स्थिती सुधारायची होती, पण त्यांना साम्यवादाची हिसा पसंत नव्हती. लोकशाहीच्या मार्गाने विचार जागृती करुन हे कार्य व्हावे असा त्यांचा आग्रह होता. समाज जातीभेद व अस्पृश्यता याने पोखरलेला असताना ह्या गोष्टी अस्तित्वातच नाहीत अशा भावनेने साम्यवादी वागतात. समाजात जातीभेदाचे वीष पूर्णपणे भिनलेले असताना साम्यवादाच्या तंत्राने क्रांती घडवून आणली तरी दलितांची स्थिती सुधारणार नाही व सवर्ण हिंदू दलितांना गुलामाप्रमाणे वागवतील असे त्यांना वाटत होते व त्यांचे म्हणणे चूक होते हे कोणालाच म्हणता येणार नाही. सध्याच्या काळी रशिया व चीन या देशातील बौध्दांची स्थिती लक्षात घेतली तर या गोष्टीचे प्रत्यंतर येते. साम्यवादी राष्ट्रांनी हल्लीच्या काळात आपापल्या देशातील बौध्दधर्मीयांचे सहाय्य घेतले व हानीनंतर आता या राष्ट्रात बौध्द धर्मीय राष्ट्राच्या प्रगतीत खीळ निर्माण करणारे आहेत म्हणून त्याचा छळ करत त्याना निधर्मी करण्याचे प्रयत्न चालू आहेत. काही वर्षापूर्वी चीनने तिबेटवर चढाई करुन दलाई लामास घालवून दिले व आजही तिबेटमधील लोकांस स्वातंत्र्याचे अधिकार देण्यास चीन शासन तयार नाही.भारतातील हिंदु समाजात आपल्या सनातन (लेपीशींरींळींश) रुढीचे जतन करून आपली सत्ता कायम ठेवावयाची आहे व ह्यासाठी तो बुध्द धर्मास महत्व देण्यास तयार नाही. बुध्द धर्माचे महत्व कमी करुन बध्द धर्म हा हिंदूंचा विकृत पंथ आहे, त्यात विशेष लक्ष देण्याचे कारण नाही अशा प्रकारचा भ्रम प्राचीन काळी निर्माण करण्यात आला, य आताही तो केला जात आहे. ह्याकडे बौध्दांनी विशेष लक्ष दिले पाहिजे. प्राचीन काळी हिंदुंनी बुध्दांना विष्णुच्या अवतारापैकी एक मानले त्यामुळे दलितांचे दलितपण नष्ट झाले नाही, उलट ते वाढले. बुध्दाना विष्णूचा अवतार मानल्यावर त्याच्या शिकवणुकीकडे लक्ष देण्याची गरज या लोकांना वाटली नाही. ह्या प्रकारचा दुष्ट प्रचार अजुनही चालू आहे. उदा., १९५८ साली भारत सरकारने प्रकाशित केलेल्या २५०० धशरीी ष ईींवहळीा या ग्रंथात बुध्द धर्म हिंदु धर्माच्या सामान्य प्रवाहाच्या अंतर्गत पडलेला एक तुकडा किंवा पाखंडी मत अशी भूमिका घेतलेली आहे. भारतात प्राचीन काळापासून संस्कृतीचे दोन प्रवाह चालू असताना असे दोन प्रवाह नसून भारतीय संस्कृती एकजिनसी आहे असा जो प्रचार करण्यात येतो त्याला तोंड देणे आवश्यक आहे.अलीकडील काही शतकात आशिया खंडातच नव्हे तर सर्व जगात बुध्द धर्माबद्दल आस्था निर्माण करण्यात पाश्चात्य विद्वानांच्या संशोधनाचा फार मोठा वाटा आहे. या विद्वानांनी महान परिश्रम घेऊन या धर्माचे जे संशोधन केले त्यामुळे पश्चिमात्य राष्ट्रांना बुध्द व त्याच्या धर्माबद्दल नवीन जिज्ञासा निर्माण झाल्यामुळे पाश्चात्य देशातील लोक आशियास विशेषतः भारत व चीन या देशास भेटी देत असतात. परंतु या विद्वानांपैकी बऱ्याच लोकांच्या ग्रंथामध्ये बुध्द धर्म हा हिंदु धर्माचा भाग आहे अशी चुकीची भुमिका घेण्यात येते ही गोष्ट लक्षात घेऊन ह्या ग्रंथाचे चिकित्सकपणे परिक्षण केले पाहिजे. शिवाय या पाश्चात्य पंडितांचे कार्य संशोधन मुख्यतः बुध्दाच्या तत्वज्ञानापुरतेच मर्यादित आहे. आशियातील बुध्द धमनि सध्याच्या परिस्थितीत कोणती भुमिका स्वीकारावी याचा बोध या तत्वज्ञानाने होत नाही. तेव्हा आशियातील बुध्द धमनि सध्याच्या परिस्थितीत कोणती भुमिका स्वीकारावी याचा शोध आशियातील बुध्द/बौध्द जनतेने केला पाहिजे.आशियातील बौध्दांनी कोणती भूमिका स्वीकारावी याबाबतीत मार्गदर्शन भारताच्या घटनेवरुन होऊ शकते. डॉ. बाबासाहेबांच्या प्रयत्नाने जी राज्यघटना निर्माण झाली तिच्यामुळे भारतात बुध्द धर्माच्या विकासास फारच मोठे सहाय्य लाभले आहे. जे समाज परिवर्तनाचे कार्य शेकडो भिक्खूंच्या प्रयत्नाने साध्य होऊ शकले नसते ते कार्य आता राज्य घटनेच्या तरतुदीमुळे शासनाचे अधिकारी व इतर लोक करीत आहेत. हे कार्य मुख्यतः राजकीय व कायदेविषयक आहे. भारतात सर्वांना समान संधी लाभावी म्हणून घटनेने मागास वर्गाला संरक्षण देण्याच्या ज्या तरतूदी केल्या आहेत त्यानुसार वर्तन शासन व इतर संबंधिताकडून घडावे व समाजाची प्रगती घटनेतील मार्गदर्शक तत्वाप्रमाणे घडावी ह्याबाबत दक्षता घेणे हे भारतीय बौध्दांचे कर्तव्य आहे. सध्या भारतातील अनेक गट राज्यघटनेत आपल्या ध्येय धोरणानुसार बदल घडवून आणून समान संधीच्या तत्वास खो द्यावा यासाठी क्रियाशील आहेत. काही गट भारतावर निरनिराळ्या स्वरुपात हुकूमशाही लावून दलित जनतेची गळचेपी करण्याच्या प्रयत्नात आहेत. अशा स्थितीत समाजातील सर्वच थरात घटनेचे महत्व व तिच्या तरतूदीप्रमाणे वागण्याचे शिक्षण देणे हे बौध्दसमाजाचे एक धार्मिक कर्तव्य होऊ शकते.धर्माचे कार्य वैयक्तिक व सामाजिक असे दोन्ही प्रकारचे असले पाहिजे. धर्मामुळे मनुष्याचा वैयक्तिक विकास होऊन त्याचे मन नवीन बनले पाहिजे. शिवाय धर्माच्या अभ्यासाने जीवनाच्या रहस्याचा उलगडा होऊन त्यामुळे समाजाचे प्रश्न सोडविण्याच्या बाबतीत योगदान करता आले पाहिजे. बुध्दाच्या काळी व नंतर काही शतके भारतात बुध्द धर्माचा चांगला प्रसार झाला. प्राचीन काळी अश्वघोष, नागार्जुन, वसुबंधु आर्यदेव, धर्मकिर्ती यासारखे थोर बुध्द विचारवंत होऊन गेले. त्यांनी भारतात तर्कशास्त्र, मानसशास्त्र, तत्वज्ञान इ. विकासाच्या बाबतीत महत्त्वाचे योगदान केले आहे. त्यांच्या विचाराचा प्रभाव शंकराचार्या-सारख्या तत्वज्ञानयांवरसुध्दा पडला आहे. पण खरी गोष्ट अशी दिसते की बुध्द धर्मात जी अनेक मोलाची तत्वे दडलेली आहेत त्याची जाणीव या प्राचीन विचारवंतवादी झाली नसावी. बुध्द धर्म स्थितीशील आहे असे कल्पून त्यांनी बुध्दाच्या वचनाचा अर्थ लावण्याचा प्रयत्न केला.. पण जीवन गतीशील आहे व बुध्दाची शिकवण गतीशील जीवनात् निर्माण होणारे प्रश्न सोडविण्यास लागू पडते ह्याची जाणीव त्याकाळच्या लोकात झाली नाही तर त्यात आश्चर्य करण्यासारखे काही नाही. सध्याच्या काळी पाश्चात्य देशात अन्वेशन पध्दती स्वीकारली गेली आहे व तिच्यामुळे जे संशोधन झाले आहे, त्याच्यामुळे बुध्दाची तत्वे आपल्या दैनंदिन जीवनातील प्रश्न सोडविण्यास कशी लागू करता येईल याचा विचार करणे शक्य झाले आहे. यामुळे यापुढील काळात गतीमान समाजाचे नीती शास्त्र निर्माण करता येईल व समाजाच्या सर्व पातळीवरील प्रश्न सोडविता येतील असे म्हणावयास हरकत नाही.यापुढील काळात विज्ञानांच्या प्रगतीमुळे जगातील सर्वच विचारवंतांसमोर नवीन आव्हान उभे राहाणार आहे. विज्ञानाचे कार्य विधायक व संहारक अशा दोन्ही स्वरुपाचे असते. यापुढील काळात विज्ञानाच्या प्रगतीमुळे अन्नधान्याची प्रगती विपुल प्रमाणात होऊ लागेल. केवळ जमिनीवरच नव्हे तर समुद्रात व अवकाशात अन्नधान्ये निर्माण करण्याचे प्रयत्न होतील व त्यामुळे अन्नधान्याची विपुलता राहील. हे विज्ञानाचे विधायक कार्य होय. ह्या विधायक कार्याबरोबरच जगात गणकयंत्रे, यंत्रमानव व विद्युत क्षेत्रातील नवीन शोधामुळे समाजात अभूतपूर्व अशी स्थित्यंतरे घडून येतील. त्यामुळे समाजात जो विस्कळितपणा निर्माण होईल तो नाहीसे करण्याचे कार्य धर्मास करावे लागणार आहे. आता सुध्दा विज्ञानाच्या शोधामुळे एकाहून एक भयंकर अशी प्रभावी अण्वस्त्रे निर्माण होत आहेत. यामुळे २१ व्या शतकात जगाची स्थिती पूर्णपणे बदलून जाईल व नवीन प्रश्न निर्माण होतील. ह्या सर्व गोष्टी लक्षात घेऊनच धर्म शिक्षणाची योजना आखावी लागेललागेल

डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी धम्म क्रांती घडवून आणली, या देशात एक अपूर्व अशी क्रांती झाली. या क्रांतीचा सर्वंकष अर्थ समजावून घेणे हा या लेखामागील एकमेव हेतू आहे. ही क्रांती कोणती? तर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी नागपूर मुक्कामी १४ ऑक्टोबर १९५६ रोजी घडवून आणलेले भारतीय अस्पृश्यांचे धर्मांतर! हे धर्मातर म्हणजे मानवी इतिहासातील आणखी एक धर्मान्तर नव्हते. कारण हे धर्मान्तर म्हणजे एका मानवी समूहाने एका धर्माकडून दुसऱ्या धर्माकडे केलेला प्रवास नव्हता. तर 'धर्म' या संकल्पनेचा त्याग करून 'धम्म' या संकल्पनेकडे केलेला क्रांतीकारक प्रवास होता आणि हा प्रवास 'धर्म' या संकल्पनेच्या पारंपारिक प्रवाहाविरूध्द केलेला एक अपूर्व असा क्रांतिकारक प्रवास होता. म्हणूनच एका धर्मातून दुसऱ्या धर्मात जाणे एवढाच त्याचा सीमीत अर्थ नव्हता.

धर्मान्तर म्हणजे एका धर्मातून दुसऱ्या धर्मात जाणे एवढाच अर्थ धर्मान्तर या शब्दाला आजवर चिकटला होता. आणि त्याला चिकटलेला इतिहास याहून वेगळा नव्हता. हा इतिहास १९५६ साली बदलला गेला. राजाश्रयावर अवलंबून असणारे धर्माचे अस्तित्व लोकाश्रयाशिवाय टिकू शकत नाही आणि लोकाश्रयांवर विस्तारणारा धर्म अल्पजिवी ठरू शकणार नाही, हे अबाधित सत्य लक्षात घेऊन डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी आपल्या ५ लाख अनुयायांसह बौध्द धम्मात प्रवेश केला आणि बौध्दधम्माला लोकाश्रय लाभला. ही इतिहासातील एक अपूर्व घटना होती आणि तिलाच आम्ही खरीखुरी क्रांती मानतो.

क्रांती या शब्दाचा अर्थ एकदम झालेला बदल. आणि असा बदल फक्त राजकीय सत्तांतरातच संभवतो असा काहींचा चुकीचा ग्रह झालेला आहे. त्यामुळे राज्यक्रांती, समाज क्रांती आदि शब्द रूढ झालेले आहेत. सत्तांतर झाले अथवा भोवतालची परिस्थिती बदलली की माणूस आपोआप बदलतो हा समज निखालस खोटा आहे. मानवी जीवनमूल्ये आणि आदर्श जो पर्यंत बदलत नाहीत तो पर्यंत एखादा समाज पूर्णतः बदलू शकत नाही; हे आजवरच्या इतिहासाने सिध्द केले आहे. सत्तेतील अथवा सामाजिक परिस्थितील बदल हे बाह्य बदल आहेत आणि त्यामुळे माणसाचे अंतरंग बदलत नाही. त्यामुळे राज्यक्रांत्या झाल्या, शासनयंत्रणेचा एकसत्ताक ते कडून लोकसत्ताककडे असा विकास व प्रवास झाला, भोवतालची परिस्थिती बदलली तरी माणूस तोच राहिला. जुना जुनाट जीवनमूल्यांना चिकटून राहिलेला,

त्यामुळे वरवरच्या बाह्य बदलाने अंतरंग बदलेल असे म्हणणे उचित होणार नाही व त्या बदलाला क्रांती म्हणणेही उचित होणार नाही. माणसाची मने गुलाम ठेवून त्यांना लाभलेले स्वातंत्र्य त्यांना उपभोगता येणार नाही. म्हणूनच इथे एका मानसिक क्रांतीची गरज होती. मन नवे झाल्याशिवाय माणूस नवा होत नाही. मन नवे मन घडविल्याशिवाय नवा माणूस घडविता येत नाही. आणि नवा माणूस घडविण्यासाठीच धम्माची आवश्यकता होती. म्हणूनच आजवरच्या क्रांत्याहून ही क्रांती वेगळी व मूलभूत आहे. म्हणूनच तिला आम्ही खरीखुरी क्रांती मानतो. ही क्रांती म्हणजेच धम्मक्रांती. धम्माने केलेली क्रांती. घडविलेला नवा माणूस. आणि

त्याच्या सोबत जन्माला आलेले नवे प्रश्न, नव्या समस्या आपणाला प्रथम नीट आकलन झल्या पाहिजेत. ही काळाची गरज आहे. त्यातूनच अशी एखादी धम्मपरिषद बोलवण्यात आली पाहिजे.

काही लोक म्हणतात, धर्म ही संकल्पना आज कालबाह्य झाली आहे. हे एक सत्य आहे कारण धर्म ही संकल्पना पुरातन व पारंपारिक आहे व ती आजच्या विज्ञान युगात वावरणाऱ्या माणसाला पूरक राहिलेली नाही. त्यातील विसंगती आज उठून दिसत आहेत. जाचक होत आहेत. याचा अर्थ 'धम्म' ही संकल्पना कालबाह्य झाली आहे. फारतर 'धर्मा'तील परंपरा कालबाह्य झालेल्या आहेत म्हणून 'धम्मा' तील नीति-नियम कालबाह्य झालेले नाहीत. कारण धर्म म्हणजे आधिभौतिकतेशी मानवाचे नाते प्रतिबद्ध करणारी पारलौकीक गोष्ट, तर धम्म म्हणजे मानवाचे मानवाशी असलेले नाते विषद करणारे जगण्याचे भौतिक नियम. म्हणजेच जुनाट मनोरचना जन्माला घालणारी 'धर्म' ही संकल्पना व नवी मनोरचना घडविणारी 'धम्म' ही संकल्पना यात महद्अंतर आहे व या संकल्पना परस्पर विरूध्द आहेत यात वाद नाही. त्याचमुळे सगळे एकाच मापाने आणि मनःप्रवृतीने तोलणे अन्यायकारक ठरेल. त्याचबरोबर धम्माच्या नावाने आज जे काही चालले आहे, ते सगळे बुध्दाच्या 'धम्म' या संकल्पनेत बसते असे म्हणणे बुध्दावर अन्याय करणारे ठरेल. म्हणूनच 'धम्म' ही मूळ कल्पना नीटपणे जाणून घेण्याची नितांत गरज आहे. आणि त्यासाठीच ही धम्म परिषद बोलावलीजावी. 'धम्म' हा शब्द याच विशाल अर्थाने  डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी संकल्पित केला आहे   . आजवर अनेक धम्म परिषद झाल्या असतील काही भिक्खुजनांनी बोलाविलेल्या प्राचीन धम्मपरिषदांना संगिती म्हणण्यात येते. त्या अथनि ही संगिती नव्हे! ती बौध्दधम्म अनुयायांनी बोलावलेली एखादी धम्म परिषद भरवली गेली पाहिजे. आणि तिच्यात भिक्खुपेक्षा सामान्यजनांना अधिक स्थान देण्यात आले पाहिजे. परंपरेपेक्षा लोकजीवनाला आणि नवतेला नव्या विचारांना अग्रस्थान हेच धम्म क्रांती चे प्रमुख अधिष्ठान आहे. तशीच ती जागतिक बौध्दधम्मपरिषदेच्या पारंपारिक पिठाहूनही वेगळी आहे. कारण पारंपारिक बौध्दधम्म पालन करणारे जगातील बौध्द व 'धम्मा' शी नाते जुळवू इच्छिणारे आजचे आधुनिक भारतीय बौध्द यांच्या दृष्टिकोनात, विचार-आचारात, जीवनमूल्यात आणि समस्यात कमालीचे अंतर आहे. हे अंतर समजावून घेऊनजागतिक बौध्द भातृभाव वाढविणे हाच तिच्या मागील उद्देश आहे. म्हणूनच तिच्याबद्दल कुणाचा काही पूर्वग्रह झालाच असेल, तर तो सोडून दिला पाहिजे व गेल्या तीस वर्षात आपण जन्माला घातलेल्या नव्या संस्कृतीची व तिच्यातून जन्माला आलेल्या समस्यांचा विद्वानांकडून डोळसपणेविचार व्हावा हीच अपेक्षा.

**अरुण वाघ**
**९२२३२०३५४५**

# मराठी भाषेचा अभिजातपणा जोपासावा.-सुप्रसिद्ध कवी, लेखक प्रा. देवदत्त मुंढे

लातूर : मराठी भाषा ही महाराष्ट्राचे अस्तित्व आणि आपल्या कार्यकर्तृत्वाचा वेगळा ठसा उमटवल्यास



अस्मिता असून मराठी भाषेचा अभिजातपणा सर्वांनी जोपासावा असे प्रतिपादन सुप्रसिद्ध कवी व साहित्यिक प्रा. देवदत्त मुंढे यांनी केले. ते येथील महात्मा बसवेश्वर महाविद्यालयातील मराठी भाषा, साहित्य, वाङ्मय व संस्कृती विभागाच्या वतीने आयोजित 'मराठी भाषा गौरव दिना'च्या विशेष कार्यक्रमात प्रमुख अतिथी म्हणून बोलत होते.

या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. आनंद शेवाळे हे होते. तर विचारपीठावर कनिष्ठ महाविद्यालयाचे पर्यवेक्षक प्रा. नितीन वाणी, मराठी विभागप्रमुख प्रा. डॉ. रत्नाकर बेडगे, प्रा. व्यंकट दुडीले आदी मान्यवर विराजमान होते. कार्यक्रमाच्या प्रारंभी जगतज्योती महात्मा बसवेश्वर व ज्येष्ठ कवी कुसुमाग्रज यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले.

पुढे बोलताना प्रा. मुंढे म्हणाले की, मराठी भाषा ही आज जगभरात ज्ञान, विज्ञान, तंत्रज्ञान आणि कृत्रिम बुद्धिमत्तेच्या आभासी मायाजाळात सर्वात लोकप्रिय अशी भाषा आहे. मराठी भाषिकांनी आत्मविश्वासाने आपले भाषिक व्यवहार मातृभाषेतून करायला हवेत. भाषेच्या माध्यमातूनच मानवी जीवनाचा वेध घेतला जातो. साहित्यात मानवी जीवनाचे दर्शनच असते. त्यामुळे तरुणांनी साहित्य विषयक जाणीवा अधिकाधिक समृद्ध करून भाषेचा गौरव वाढविला पाहिजे.

श्रवण, वाचन, लेखन, भाषण यातून व्यक्तीचे जीवन अधिकाधिक समृद्ध होते. साहित्य माणसाला जोडण्याचे काम करते. मराठी भाषिक माणसांनी विविध क्षेत्रात भाषेला आपोआपच श्रेष्ठत्व प्राप्त होते, असे सांगून त्यांनी निशिगंध, माणसाने, या नजरेने, साधू, संधीसाधू यासारख्या गझल व वात्रटीका सादर करून श्रोत्यांना मंत्रमुग्ध केले.

यावेळी आपल्या अध्यक्षीय समारोपात प्राचार्य डॉ. आनंद शेवाळे म्हणाले की, महाराष्ट्रीयन संतांनी मराठी भाषेचा वेलू गगनावर नेला. जगभरात ही भाषा बोलली जाते. मराठी भाषेविषयी कोणतीही अनास्था न ठेवता भाषिक प्रेम अधिकाधिक वृद्धिंगत करून मराठी भाषा, साहित्य व संस्कृतीचे संवर्धन करणे प्रत्येकाची जबाबदारी आहे असेही ते म्हणाले.

यावेळी कु. साक्षी घोडके, कु. अवंतिका यादव या युवा कवयित्रींनी आपल्या कविता सादर केल्या. तर प्रा. डॉ. धोंडीबा भुरे, प्रा. डॉ. अश्विनी रोडे यांनीही मराठी भाषेचे गोडवे गायले.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक विभागप्रमुख प्रा. डॉ. रत्नाकर बेडगे यांनी केले. सूत्रसंचालन प्रा. मारुती माळी यांनी केले. प्रमुख अतिथींचा परिचय प्रा. शंकर भोसले यांनी सभागृहाला करून दिला. तर उपस्थितांचे आभार प्रा. व्यंकट दुडिले यांनी मानले.

कार्यक्रमाला महाविद्यालयातील प्राध्यापक, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी-विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेकरिता प्रा. विद्या ढवारे, कार्यालय प्रमुख श्री नामदेव बेंदर्गे, बालाजी डावखरे, अजय गायकवाड, गुरुप्रसाद बिराजदार यांनी परिश्रम घेतले.

# आनंदगांव येथील स्वानंद सार्वजनिक वाचनालयात जर्मन टेक्नॉलीजी मशीनच्या साहय्याने मोफत आरोग्य तपासनी शिबीर संपन्न.

केज/प्रतिनिधी-स्वानंद सार्वजनिक वाचनालय, आनंदगांव ता. केज जि. बीड च्या वाचन कक्षात दिनांक २४ -फेब्रुवारी २०२६ रोजी सकाळी १० ते ५ या वेळात प्रिस्टाईन आयुर इंडिया चॅरिटी फाऊंडेशन, व आनंद ग्रामीण विकास प्रतिष्ठाण व स्वानंद सार्वजनिक वाचनालय, आनंदगाव ता. केज जि. बीड यांच्या संयुक्त विद्यमाने जर्मन टेक्नॉलॉजी मशिनच्या साहाय्याने मोफत आरोग्य तपासनी शिबीर व तज्ञांचे मागदर्शन कार्यक्रम घेण्यात आली.



डॉ. प्रविण बढे यांच्या मार्गदर्शना खाली व डॉ. राजेंद्र बळे, डॉ. राहुल शिंदे परमेश्वर भवर, मधुकर भाकरेमामा, सचिन शिंदे यांनी मोफत आरोग्य तपासनी करून मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाचे संयोजक व कार्यक्रमाचे अध्यक्ष संस्थेचे व ग्रंथालयाचे संस्थापक अध्यक्ष, जेष्ठ विचारवंत, जेष्ठ समाजसेवक, महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध वक्ते व परखड व्याख्याते, प्राचार्य, डॉ. वसुदेव बप्पा गायकवाड हे होते.

जर्मन टेक्नॉलॉजी मशीनच्या साहाय्याने मोफत आरोग्य तपासनी शिबीर घेण्यात आले. ५० लोकांची तपासनी सकाळी १० ते ५ या वेळात यशस्वीरित्या पूर्ण झाले.

तज्ञ टिमचे स्वागत माजी सरपंच रामराजे गायकवाड, माजी सरपंच ज्ञानोबा भोगजकर, गणपत गायकवाड, मच्छिंद्र पुरी, रविंद्र गायकवाड, बाळासाहेब गायकवाड, आनंद भैय्या गायकवाड यांच्या हस्ते पुष्पगुच्छ देवून करण्यात आले.

शेवटी अध्यक्षीय समारोप व आभारही डॉ. वसुदेव बप्पा गायकवाड यांनी मानले. या शिबीराचा महिला - पुरुषांनी सहभागी होऊन लाभ घेतला.

# एन. एम. एम. एस. परीक्षेमध्ये रामराव पाटील विधालयाचे घवघवीत यश

केज/प्रतिनिधी□शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मध्ये घेण्यात आलेल्या एन. एम. एम. एस. परीक्षा मध्ये केज येथील रामराव पाटील शाळेने यशाची परंपरा कायम राखत ३३ पैकी १४ मुलांनी यश संपादन केले आहे यामध्ये जाधव पंकज बब्रुवान या विद्यार्थ्यांनी १२८ गुण मिळवत प्रथम क्रमांक पटाकावलेला आहे, तसेच घाडगे उत्कर्ष याने १०४ गुण, महाजन आदित्य याने १००,गुण चाटे राजेंद्र यांनी ९६ गुण मिळवलेले आहेत या विद्यार्थ्यांना श्री पोटभरे श्री. देवकते श्री.इर्शाद श्री.कळेकर श्री.गोरे श्री.गायकवाड,श्री.



नाईकनवरे यांनी मार्गदर्शन केले. सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे व अध्यापकांचे शाळेचे मुख्याध्यापक तथा प्राचार्य श्री. खोसे व माऊली विद्यापीठाचे सचिव आदित्य पाटील,प्रशासकीय प्रताप मोरे यांनी अभिनंदन केले. सर्व यशस्वी विद्यार्थी व अध्यापकांचा यावेळी शाळेच्या वतीने गौरव करण्यात आला या कार्यक्रमाचे प्रास्ताविक श्री.गोरे यांनी केले, तर सूत्रसंचालन श्रीमती गिरी यांनी केले.

# श्रीकिशन सोमाणी विद्यालयात शालेय विज्ञान प्रदर्शन उत्साहात

लातूर : येथील अभिनव मानव विकास संस्था द्वारा संचालित श्रीकिशन सोमाणी विद्यालयात राष्ट्रीय विज्ञान दिनाचे औचित्य साधून शालेय विज्ञान प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले होते. अतिशय उत्साहपूर्ण वातावरणात पार पडलेल्या या विज्ञान प्रदर्शनात विद्यार्थ्यांनी अभिनव प्रयोग करून सर्वांची मने जिंकली.



या शालेय विज्ञान प्रदर्शनाचे उदघाटन राजर्षी शाहू महाविद्यालयाचे भौतिकशास्त्र विभाग प्रमुख प्रा. डॉ. अभिजित यादव यांच्या हस्ते सी.व्ही. रमण यांच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आले. विद्यालयातील विद्यार्थ्यांनी विज्ञान शिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली तयार केलेल्या यंत्राद्वारे सी.व्ही. रमण यांच्या प्रतिमेवर पुष्पवृष्टी करुन अभिनव पद्धतीने या प्रदर्शनाचे उद्घाटन झाले. यावेळी संस्थेचे अध्यक्ष डॉ. चेतन सारडा, उपाध्यक्ष विवेक रेड्डी, सचिव कमलकिशोर अग्रवाल, कोषाध्यक्ष जयेश बजाज, शालेय समितीचे अध्यक्ष अतुल देऊळगावकर, व्यंकट गर्जे आदी मान्यवरांची प्रमुख उपस्थिती होती. मान्यवरांच्या हस्ते प्रा. डॉ. यादव यांचा रोपटे, पुस्तक आणि विद्यालयाची स्मरणिका देऊन सन्मान करण्यात आला.

यावेळी बोलताना प्रा. डॉ. अभिजित यादव यांनी विद्यार्थ्यांनी अतिशय कल्पकतेने तयार केलेल्या विविध प्रयोगांची पाहणी करून कौतुक केले. या विद्यार्थ्यांनी पर्यावरण पूरक अशा अनेक प्रयोगांची निर्मिती करून आपल्यामध्येही भविष्यात चांगले शास्त्रज्ञ, वैज्ञानिक बनण्याचे कौशल्य दाखवून दिल्याचे गौरवोद्गारही त्यांनी काढले.

यावेळी होमी भाभा बालवैज्ञानिक स्पर्धा परीक्षेत तिसऱ्या फेरीसाठी निवड झालेला इयत्ता सहावीचा विद्यार्थी रुद्रदीप विष्णू देशमुख याचा तसेच सायन्स ऑलिम्पियाड मध्ये नेत्रदीपक यश संपादन केलेल्या समर्थ आर्वीकर, कु. अनन्या सिंगापूरे , कु. माऊली जगळपूरे , हर्षवर्धन बिरादार, कु. अदिती कटके, कु. सानवी पाटील, श्रेयश कांबळे या विद्यार्थ्यांचाही प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते गुलाब पुष्प, प्रमाणपत्र, गोल्डमेडल व लोकविज्ञान दिनदर्शिका देऊन सन्मान करण्यात आला.

संस्थेच्या वतीने मनोगत व्यक्त करताना अतुल देऊळगावकर यांनी विद्यालयातील विद्यार्थ्यांनी विज्ञान शिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली सादर केलेल्या विज्ञान प्रदर्शनाचे आणि अभिनव प्रयोगांचे कौतुक केले. आपल्या विद्यालयात विद्यार्थ्यांना अध्ययनासोबतच त्यांच्या उपजत कलागुणांना प्राधान्याने वाव देण्याचे काम केले जात असल्याचेही त्यांनी आवर्जून नमूद केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक मुख्याध्यापक रमाकांत स्वामी यांनी केले. प्रास्ताविकात त्यांनी या उपक्रमाच्या आयोजनामागची पार्श्वभूमी सविस्तरपणे विशद केली. विद्यालयाच्या सातत्याने राबविण्यात येणाऱ्या उपक्रमांची माहितीही त्यांनी यावेळी दिली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मधुकर काळे यांनी तर आभार प्रदर्शन सुरेखा भोसले यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी मुख्याध्यापक रमाकांत स्वामी यांच्या मार्गदर्शनाखाली पर्यवेक्षक गिरीश कुलकर्णी, सुनीता जाधव, राहुल पांचाळ यांसह सर्व शिक्षक - शिक्षिका, शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

# जिल्हा परिषदेच्या शिवकन्यांच्या यशामुळे शाळा व तालुक्याचा मान उंचावला

केज/प्रतिनिधी -बीड येथे पार पडलेल्या जिल्हास्तरीय समूहनृत्य स्पर्धेत केज तालुक्यातील जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा पैठणच्या शिवकन्यांनी दैदिप्यमान यश संपादन करत जिल्ह्यात आपला ठसा उमटविला आहे.



लहान मुलींच्या गटातून सहभागी झालेल्या पैठणच्या विद्यार्थीनींनी उत्कृष्ट सादरीकरण करत द्वितीय क्रमांक पटकावला. त्यांच्या सुसंवाद, तालबद्धता आणि आत्मविश्वासपूर्ण सादरीकरणामुळे उपस्थित मान्यवर व प्रेक्षकांनी भरभरून दाद दिली.या उल्लेखनीय यशाबद्दल तालुक्याचे गटशिक्षणाधिकारी सुनील केंद्रे, जेष्ठ शिक्षणविस्ताराधिकारी दत्तात्रय चाटे , मुमताज पठाण मॅडम, पैठण केंद्राचे केंद्रप्रमुख अण्णासाहेब जाधव,केंद्रीय मुख्याध्यापक शगोविंदराव मुळे यांनी सर्व यशस्वी विद्यार्थीनींचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

या यशामागे मार्गदर्शक शिक्षिका अनिता शिंदे मॅडम, बालासाहेब पौळ , बालासाहेब लोखंडे आणि श्रीनिवास गिरी यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले.पैठणच्या शिवकन्यांच्या या यशामुळे शाळा व तालुक्याचा मान उंचावला असून सर्वत्र त्यांचे कौतुक होत आहे.

# राजर्षी शाहू विद्या मंदिर केज येथे 'स्वयंशासन दिन' उत्साहात साजरा

केज/प्रतिनिधी.-येथील स्वामी दयानंद प्रतिष्ठान केज संचलित राजर्षी शाहू विद्या मंदिर या शाळेत नुकताच 'स्वयंशासन दिन' मोठ्या उत्साहात आणि शिस्तबद्ध वातावरणात साजरा करण्यात आला. या उपक्रमाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांनी शाळेची धुरा सांभाळत प्रशासकीय आणि शैक्षणिक कामकाजाचा प्रत्यक्ष अनुभव घेतला. सर्व प्रथम राजर्षी शाहू महाराज व सावित्रीबाई फुले यांना वंदन करून शालेय कामकाजाची सुरुवात करण्यात आली.शाळेच्या मुख्याध्यापिका श्रीमती बी. बी. चाटे यांनी या उपक्रमाचे महत्त्व नमूद केले व म्हणाल्या की, स्वयंशासन दिनामुळे विद्यार्थ्यांमध्ये नेतृत्वगुण विकसित होतात आणि त्यांना शिक्षकांच्या कार्याची जाणीव होते.स्वयंशासन दिनाचे औचित्य साधून इयत्ता सातवीच्या विद्यार्थ्यांनी शाळेची संपूर्ण जबाबदारी आपल्या खांद्यावर घेतली होती. सकाळी परिपाठापासून ते शाळा सुटेपर्यंत या विद्यार्थ्यांनी इयत्ता पहिली ते सहावीपर्यंतच्या वर्गांवर पूर्ण वेळ अध्यापनाचे कार्य केले. गणिताची सूत्रे असोत वा भाषेतील व्याकरण, या बालशिक्षकांनी अतिशय आत्मविश्वासाने आपले विषय मांडले.या दिवसाचे विशेष आकर्षण म्हणजे शाळेच्या कामकाजाचे नियोजन. शाळेच्या मुख्याध्यापिका श्रीमती बी. बी. चाटे यांच्या मार्गदर्शनाखाली प्राची सुरेंद्र शिंदे हिने 'विद्यार्थिनी मुख्याध्यापिका' म्हणून पदभार स्वीकारला व पूर्ण वेळ कामकाज पाहिले. तिने संपूर्ण शाळेचे नियंत्रण, वर्गांचे वेळापत्रक आणि शिस्तीचे चोख पालन केले. या उपक्रमाला शाळेतील ज्येष्ठ शिक्षक व्ही. बी. यादव,ए. डी. देशमुख,आर. एस. क्षीरसागर,जि. बी. डिरंगे,जे. आर. मस्के,अनिता जाधव व ध्वजा गायकवाड यांचे मोलाचे सहकार्य लाभले.शिक्षकांनी विद्यार्थ्यांच्या अध्यापन कौशल्याचे कौतुक केले आणि त्यांना मोलाच्या सूचना दिल्या.



दिवसभराच्या या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये आनंदाचे वातावरण होते. स्वतः शिकवताना मिळणारा आनंद आणि जबाबदारीची जाणीव यामुळे हा दिवस विद्यार्थ्यांसाठी अविस्मरणीय ठरला.

हे पत्रक मालक, प्रकाशक, संपादक अशोक नामदेवराव हनवते यांचे करीता मुद्रक घोणे नरसिंह पांडूरंग यांनी मॅजिक पब्लीकेशन, शॉप नं. १०, मनपा शॉपींग कॉम्प्लेक्स, गांधी चौक, लातूर - ४१३५१२ येथे छापून कार्यालय द्रोपत माय निवास, खडक हनुमान मंदिर, मिलिंद नगर, लातूर ता. जि. लातूर - ४१३५१२ येथे प्रकाशित केले.